## जाहिरात नमुना सन २०२०-२१

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर परिमंडळ, लातूर

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे लातूर महानगरपालिका येथे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (करार दि.३१/०३/२०२१ पर्यंत) खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**लातूर महानगरपालिका पदस्थापना**

| अ. क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जास्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैदयकिय अधिकारी (पुर्ण वेळ) | ०५ | MBBS MCI/MMC Council कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्षे | रु. ६०,०००/- | लातूर महानगर पालिका कार्यक्षेत्र | अनु.जाती - १<br>अनु. जमाती- १<br>इ.मा.व - १<br>ई.डब्ल्यु.एस.- १<br>खुला - १ |
| २ | औषध निर्माता | ०४ | B. Pharma/ D. Pharma MSPC कडील नोंदणी अनिवार्य | ६५ वर्ष | रु. १७,०००/- | लातूर महानगर पालिका कार्यक्षेत्र | अनु.जमाती -०१<br>विमुक्त जातीअ- ०१<br>खुला - ०१<br>ई.डब्ल्यु.एस.- १ |

उपरोक्त पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या सांक्षाकिंत केलेल्या छायांकित प्रतिसह रिक्त असणाऱ्या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दि.०५/०२/२०२१ रोजी संध्याकाळी ५.४५ वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) **" उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर परिमंडळ, लातूर, आरोग्य संकुल, तिसरा मजला, बार्शी रोड, नविन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी, लातूर ४१३५१२"** या ठिकाणी सकाळी १०.३० ते सायं. ५.४५ पर्यंत या वेळेत सादर करावेत. दि.०५/०२/२०२१ रोजी संध्याकाळी ५.४५ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जानार नाही. त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही तसेच ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- रुपयांचा डीडी **Deputy Director of Health Services, Latur** या नावे जोडणे आवश्यक आहे. सदरचा डीडी या नावाने काढावा.

२) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि.३१ मार्च २०२१ पर्यंतचा राहू शकेल. परंतू, वरील पदे सन २०२१-२२ मध्ये मंजूर झाल्यास पुढील ११ महिन्याची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

३) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी एमबीबीएस यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष व औषधनिर्माता पदांसाठी वयोमर्यादा ६५ वर्ष राहिल. (**सध्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी पाच वर्ष वयोमर्यादा शिथील राहील**.)

४) वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील तसेच निवड झाल्यानंतर प्रत्येकवर्षी सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुनर्नियुक्ती आदेश देण्यात येतील.

५) उपरोक्त संबधित पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.

६) जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता उमेदवारांची संख्या विचारात घेवून गुणवत्तेनुसार मुलाखतीकरीता १ : ५ प्रमाणे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

७) शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उमेदवारांना मानधन शासन निर्णय क्र. संकिर्ण - २७१५/ प्रक्र /१००/१३ दि.१७.१२.२०१६ व राज्य आरोग्य सोसायटी कडून प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार अदा करण्यात येईल.

८) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

९) मा. सहसंचालक (अतांत्रिक), रा.आ.अ. मुंबई यांचे क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण/ २४५६४-७७४/१६ दि.२०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

१०)केंद्र/राज्य शासनाने संबधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११)सर्व पदांसाठी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष) , पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून ( १० वी व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसांक्षाकिंत) जोडावीत नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईजड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहीत.

१२)अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

**१३)<u>अर्जदारांची अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्ठपणे नमुद करावा.</u>**

१४)अर्जसादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवानांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१५) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/ रद्द करणे / पदभरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा. उपसंचालक, आरोग्यसेवा, लातूर परिमंडळ, लातूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१६)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१७)मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर करण्यात आलेला असून, सदरील नमुण्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धण्यात येणार नाही.

१८)अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१९) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुंजू होताना सादर करावा लागेल.

२०) निवड झालेल्या उमेदवारांन नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ०७ दिवसांमध्ये नियुक्तीच ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपूष्ठात आणूण, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

२१) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी शैक्षणीक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र इत्यादी साक्षांकीत प्रतिसह व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी हजर रहावे.

२२)उपरोक्त पदा करीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाची छानणी करुन पात्र ठरणाऱ्या उमेदवाराकरीताच राबविण्यात येईल. पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, अंतिम निवड यादी तसेच मुलाखतीचा दिनांक व वेळ आणि पदभरती संदर्भातील वेळोवेळी प्रकाशीत करण्यात येणाऱ्या सुचना फक्त (www.nrhm.maharashtra.gov.in, www.arogya.maharashtra.gov.in & www.latur.gov.in ) या संकेतस्थळावर तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रकाशीत करण्यात येईल याची वेगळी सुचना दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सदस्य सचिव**
**तथा**
**विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक**
**उपसंचालक, आरोग्यसेवा, लातूर परिमंडळ, लातूर**

**अध्यक्ष निवड समीती**
**तथा**
**उपसंचालक, आरोग्यसेवा, लातूर परिमंडळ, लातूर**

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२०-२१
## राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर परिमंडळ, लातूर.

पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वतः साक्षांकीत करुन लावावे करावे

प्रति,
मा. उपसंचालक,
आरोग्य सेवा, लातुर परिमंडळ,
लातूर.

पदाचे नांव :- ..........................................................................................

पद स्थापना कार्यक्षेत्र :- ..........................................................................................

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :- ..........................................................................................

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ..........................................................................................

३) जन्म तारीख :- वर्ष ..........महिना............दिवस...........................
अक्षरी ..........................................................................................
..........................................................................................
वय :- ..........वर्ष पुर्ण .........महिने,......... दिवस..........
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
(मोबाईल क्र :- .........................................) (नमुद करणे अनिवार्य)
ई-मेल आयडी :- ..........................................................................................

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय / नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही जातीचा प्रवर्ग :- ...............................
जातीचे नांव :- ...............................

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ...............................
(नमुद करणे अनिवार्य)

७) डिडि क्रमांक व दिनांक व रक्कम :- ..........................................................................................

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे / नाही.

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड / विदयापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | कितीपैकी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | धारण केलेल्या पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१) ........................................ २) ........................................

३) ........................................ ४) ........................................

५) ........................................ ६) ........................................

७) ........................................ ८) ........................................

८) ........................................ १०)........................................

१२) वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यासं व त्या अनुषगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- लातूर स्वाक्षरी :-..............................................

दिनांक :- / /२०२१ अर्जदार :- ..............................................